# जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड

---

वाचाः-

1. शासन सामान्य प्रशासन विभाग यांचा निर्णय क्र.अकंपा-10041/प्रक्र 5/2004/08दि.22.08.2005.
2. शासन अधिसुचना सा.प्र.वि तलाठी सेवा प्रवेश नियम-2010 दिनांक 01 जुलै 2010
3. शासन सामान्य प्रशासन विभाग यांचा निर्णय अकंपा/1217/प्रक्र102/आठ दि. 21 सप्टेंबर 2017
4. शासन सामान्य प्रशासन विभाग यांचा निर्णय अकंपा/1219/प्रक्र56/आठ दि.11 सप्टेंबर 2019
5. सा.प्र.विभागाकडील शासन निर्णय अकंपा-1221/प्र.क्र.186/आठ दि.26 ऑगस्ट 2021
6. सा.प्र.विभागाकडील शासन निर्णय अकंपा-1219/प्र.क्र.56/आठ दि. 22. डिसेंबर 2021
7. सह सचिव,महसुल व वन विभागयांचे पत्र क्र.माअअ-2023/प्र.क्र.63/ई-10 दि.12 जुन 2023.
8. मा.महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ छत्रपती संभाजीनगर कडील मुळ अर्ज क्र.737/2023 मधील आदेश दि.04.09.2023
9. या कार्यालयाकडील वर्ग - 3 ची सामायिक अनुकंपा जेष्ठता नोंदवही.

---

**E Comp.No.:1817605 File No.:NANDED-2702(6)/96/2025-NAN-EST दिनांकः- /07/2025**

**<u>आदेश :-</u>**

शासकीय सेवेत असतांना दिवगंत झालेल्या कर्मचा-याच्या वारसास अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यासाठी सरळसेवा कोट्यातील प्रतिवर्षी रिक्त होणा-या पदांच्या 20 टक्के पदे अनुकंपा तत्वावर भरावयाची संदर्भ क्र.04 वरील शासन निर्णयाद्वारे निश्चित केलेली मर्यादा संदर्भ क्र.06 च्या शासन निर्णयाव्दारे दिनांक. 01.01.2022 पासून पुढील तीन वर्षासाठी म्हणजेच दि.01.01.2022 ते दि.31.12.2024 पर्यंत वाढविण्यात आली आहे. संदर्भ क्र.07 अन्वये निर्माण करण्यांत आलेल्या नवीन साझांच्या 20% अनुकंपा नियुक्ती देण्यांत यावी असे निर्देश आहेत.

त्यानुसार नांदेड जिल्हा आस्थापनेवरील सामाईक एकत्रित अनुकंपा प्रतिक्षा यादीतील उमेदवारास खालील तपशिलानुसार तसेच अटी व शर्तीच्या अधिन राहून ग्राम महसूल अधिकारी संवर्गात सातव्या वेतन आयोगानुसारच्या वेतन मॅट्रीक्स एस – 8, वेतनस्तर रु 25500 - 81100 या वेतन स्तरामध्ये त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या प्रवर्गात ग्राम महसूल अधिकारी, या पदावर पुढीलप्रमाणे नियुक्ती देण्यात येत आहे.

| अ.क्र. | अनुकंपा उमेदवारांचे नांव व मुळ कार्यालय | अनुकंपा सामायिक जेष्ठता क्रमांक | मूळ प्रवर्ग | नियुक्तीचा प्रवर्ग | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री.किरण बब्रुवान रामतीर्थे, कार्यालय - प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी, छ.संभाजीनगर | 856 | खुला | खुला (अनुकंपा) | साझा - चोरंबा बु., तहसिल कार्यालय हदगाव |
| 2. | श्री.अन्सारी मो.हलीम मो.इसा अन्वर, कार्यालय - अधीक्षक अभियंता नांदेड पाटबंधारे मंडळ,नांदेड | 865 | इ.मा.व | इ.मा.व (अनुकंपा) | साझा - लोहगाव, तहसिल कार्यालय बिलोली |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 3. | श्री.राजु नारायण भुते,<br>कार्यालय - अधीक्षक अभियंता नांदेड पाटबंधारे मंडळ,नांदेड | 875 | वि.मा.प्र. | वि.मा.प्र. (अनुकंपा) | साझा - शेवाळा, तहसिल कार्यालय देगलूर |
| 4. | श्री.भामा तुकाराम मड्डावण,<br>कार्यालय - अधीक्षक अभियंता नांदेड पाटबंधारे मंडळ,नांदेड | 888 | वि.जा.अ | खुला (अनुकंपा) | साझा - करडखेड, तहसिल कार्यालय देगलूर |
| 5. | श्री.प्रसाद पंडीत सुर्यवंशी,<br>कार्यालय - अधीक्षक अभियंता नांदेड पाटबंधारे मंडळ,नांदेड | 893 | खुला | खुला (अनुकंपा) | साझा - निवळी, तहसिल कार्यालय मुखेड |
| 6. | श्री.सचिन हनमंतराव हंबर्डे,<br>कार्यालय - अधीक्षक अभियंता नांदेड पाटबंधारे मंडळ,नांदेड | 894 | खुला | खुला (अनुकंपा) | साझा - कंचली, तहसिल कार्यालय किनवट |
| 7. | श्री.मृगेश नागेश नाडार,<br>कार्यालय - अधीक्षक अभियंता नांदेड पाटबंधारे मंडळ,नांदेड | 895 | खुला | खुला (अनुकंपा) | साझा - माळाकोळी, तहसिल कार्यालय लोहा |
| 8. | श्री.जालमसिंह माधवसिंह ठाकूर,<br>कार्यालय - अधीक्षक अभियंता नांदेड पाटबंधारे मंडळ,नांदेड | 896 | खुला | खुला (अनुकंपा) | साझा – भुतन हिप्परगा, तहसिल कार्यालय देगलूर |

**<u>अटी व शर्ती:</u>**

1. सदरची नेमणूक निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असुन भविष्यात पदे कमी झाल्यास इ. कारणास्तव त्यांची सेवा समाप्त केल्यावर त्यांचा या पदावरील नेमणुकी संबंधी कोणताही हक्क राहणार नाही.
2. सदर नियुक्ती हि संदर्भ क्र.08 वर नमुद मा.महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचे कडील मुळ अर्ज क्र.737/2023 मधील आदेश दि.04.09.2023 नुसार मा. न्याधिकरणाच्या अंतीम निर्णयाच्या अधीन राहुन तात्पुरत्या स्वरुपात देण्यात येत आहे.
3. सदरची नेमणूक कोणतीही पुर्व सुचना / नोटीस न देता व कोणतेही कारण न दर्शविता केव्हाही समाप्त करण्यात येईल.
4. ही नेमणूक तात्पुरती असुन पुर्व चारित्र्य व वर्तणूक यांच्या समाधानकारक तपासणी अहवालावर अवलंबुन राहील. असा अहवाल आक्षेपार्ह असल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता नौकरीतुन काढून टाकण्यात येईल. पडताळणी अहवालाची पुर्तता 3 महिण्यांत करावी.
5. नेमणुकीच्या ठिकाणी हजर होणेसाठी प्रवासभत्ता / भाडे देय नाही.
6. महाराष्ट्र नागरी सेवा नियमावली व शासनाने कर्मचा-यांसाठी केलेले नियम कायदे ज्ञात करुन घेण्याची व अनुपालन करण्याचे उत्तर दायित्व संबंधितास बंधनकारक राहील.
7. उमेदवारास नोकरी सोडावयाची असल्यास तशी आगावू सूचना 1 महिना अगोदर देवून राजीनामा मंजूर करुन घ्यावा लागेल. अशी अगावू सुचना न दिल्यास त्यांच्याकडुन 1 महिण्याचे वेतन वसुल करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिका-यास राहतील.
8. उमेदवाराने वैद्यकिय मंडळाकडून शारिरिक दृष्ट्या पात्र असल्याबाबतचे वैद्यकिय प्रमाणपत्र शासन सेवेत रुजु झाल्यापासून 3 महिन्याचे आंत सादर करावे लागेल.
9. उमेदवारास नियुक्तीचे आदेश प्राप्त झाल्यापासुन नोकरीच्या ठिकाणी 30 दिवसांच्या आत कामावर हजर होणे बंधनकारक आहे. अन्यथा सदर नियुक्तीचे आदेश रद्द समजण्यात येतील.
10. शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र.अनियो-1005/126/सेवा-4/दि.31 ऑक्टोबर 2005 अन्वये 01 नोव्हेंबर 2005 रोजी किंवा त्यानंतर त्यांची शासकिय सेवेत नियुक्ती होताच त्यांना नवीन परीभाषीत

अंशदान निवृत्ती योजना लागु ठरेल. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना (महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम 1984) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागु होणार नाही.

11. नेमणुक केलेल्या उमेदवार यांनी त्यांचे नेमणुकीच्या ठिकाणी रुजु होताना वय, शैक्षणीक अर्हता तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र) नियम 2005 इत्यादी मुळ कागदपत्रे संबंधीत कार्यालय प्रमुख यांचेकडे सादर करावित संबंधीत कार्यालय प्रमुख त्यांचे प्रमाणपत्रे इत्यादी मुळ कागदपत्र तपासुन त्यांना रुजु करुन घेतील.
12. उमेदवार मराठी व हिंदी भाषा परीक्षा सूट मिळण्यास पात्र नसल्यास उमेदवारास एतदर्थ मंडळाने निर्धारित केलेल्या भाषा विषयक परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.
13. भविष्यात शासनाकडून वेळोवेळी पारीत करण्यात येणारे कायदे नियम उमदेवारास बंधनकारक राहतील.
14. उमेदवाराने सादर केलेली कागदपत्र / दाखले ही भविष्यात चुकीची/बोगस आढळली तर सदर उमेदवाराविरुध्द फौजदारी स्वरुपाची कार्यवाही करण्यात येऊन त्यांना सेवेतुन काढुन टाकण्यात येईल.
15. नियुक्त उमेदवाराने सामान्य प्रशासन विभागाचे क्र. बीसीसी/2011/प्र.क्रं.1064/2011/16 ब दि.12.12.2011 अन्वये सहा महिन्याच्या आत जात प्रामणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहिल.
16. महाराष्ट्र शासनाने दिलेल्या आदेशानुसार नियुक्तीच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या कालावधीत मत्ता व दायित्वे विवरणपत्र कार्यालय प्रमुखाकडे सादर करणे बंधनकारक राहील.
17. शासन निर्णय, माहिती तंत्रज्ञान दि.04.2.2013 मध्ये नमुद केल्यानुसार संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. नसल्यास सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.19.03.2003 नुसार संगणकाची अर्हता नियुक्तीच्या दिनांकापासून 2 (दोन) वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहिल.
18. उपरोक्त अटी व शर्ती मध्ये शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारणा व मा.न्यायाधिकरण तसेच मा.न्यायालयाचे आदेश उमेदवारास बंधनकारक राहतील.

Signed by
Rahul Kashinath Kardile
Date: 07-07-2025 11:27:21

**(राहुल कर्डिले,भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी नांदेड**

**प्रतिलीपीः-**

1.मा.प्रधान सचिव,महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सादर.
2.मा.विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांना माहितीस्तव सादर.
3.उपविभागीय अधिकारी,हदगाव/बिलोली/देगलूर/किनवट/कंधार यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
4.तहसीलदार,हदगाव/बिलोली/देगलूर/मुखेड/किनवट/लोहा यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
5.उपकोषागार अधिकारी,हदगाव/बिलोली/देगलूर/मुखेड/किनवट/लोहा यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
6.प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी, छ.संभाजीनगर आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
7.अधीक्षक अभियंता नांदेड पाटबंधारे मंडळ,नांदेड यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
8.कार्यासन अधिकारी, आस्थापना शाखा - 1 जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड यांना माहिती व कार्यवाहीस्तव.
9.संबंधीतास अनुपालनास्तव.